श्री.शिरीष दत्तात्रय बनसोडे यांना ग्रामविकास विभागाला संगणक अर्हता परीक्षा (MS-CIT) प्रमाणपत्र सादर करावयाच्या मुदतीची अट शिथिल करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन आदेश क्रमांकः मविसे-१०/२०११/प्र.क्र.१२५/आस्था-३ अ

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१
तारीखः २८ जानेवारी, २०१६

प्रस्तावना :-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या एकूण १४ उमेदवारांपैकी दि.१०.६.२००९ च्या आदेशान्वये १३ व दिनांक २९.८.२००९ च्या आदेशान्वये १ अशा एकूण १४ उमेदवारांना परिविक्षाधीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी/ गट विकास अधिकारी, गट-अ संवर्गातील पदांवर नियुक्त्या देण्यात आल्या होत्या. सदर आदेशातील अ.क्र.२ (८) नुसार नियुक्ती दिलेल्या उमेदवारांनी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.७ ऑगस्ट, २००१ मधील तरतुदीनुसार संगणक हाताळणे/ वापराबाबतचे ज्ञान असल्याबाबतचे शासन मान्य प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील, अशी अट घालण्यात आली आहे. सदर उमेदवारांपैकी श्री.बनसोडे शिरीष दत्तात्रय यांनी संगणक परीक्षा (एमएस-सीआयटी) जानेवारी-२०१३ मध्ये दिली असून सदर परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र शासनास सादर केले आहे. तथापि, श्री.बनसोडे यांनी संगणक अर्हतेची परीक्षा (MS-CIT) नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षानंतर जानेवारी, २०१३ मध्ये उत्तीर्ण केली असल्याने त्यांच्या सदर कालावधीतील वेतनवाढी रोखून ठेवाव्यात की त्यांची सेवा समाप्त करण्यात यावी, याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या कार्यासन ३९ कडून अभिप्राय घेण्यात आले.

सामान्य प्रशासन विभागाच्या कार्यासन ३९ ने शासन निर्णय, दि.२०.७.२००२ मधील वेतनवाढ रोखून ठेवण्याची तरतूद दि.१/१/२००१ रोजी शासकीय सेवेत कार्यरत असणाऱ्या शासकीय सेवकांसाठी आहे. ती या प्रकरणी लागू करता येणार नाही. मात्र, शासन अधिसूचना, सा.प्र.वि., क्र.सेप्रनि-१०९८/ प्र.क्र.७/९८/१२, दि.२५ जानेवारी, १९९९ च्या नियम ६ अनुसार ग्राम विकास विभागाला प्रमाणपत्र सादर करावयाच्या मुदतीची अट, कारण अभिलिखीत करुन शिथिल करता येईल, असे अभिप्राय दिले आहेत.

आदेशः-

सामान्य प्रशासन विभागाच्या उपरोक्त अभिप्रायास अनुसरुन, श्री.शिरीष दत्तात्रय बनसोडे यांनी संगणक अर्हतेची परीक्षा (MS-CIT) प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या मुदतीनंतर दि.२३ एप्रिल, २०१३ रोजी प्राप्त केले आहे. तथापि, श्री.बनसोडे हे फेब्रुवारी २०१० ते ऑगस्ट, २०१२ या कालावधीत पंचायत समिती, धारणी (मेळघाट) या अत्यंत दुर्गम आणि संवेदनशील अशा आदिवासीबहुल ठिकाणी कार्यरत होते. या भागात संगणक अर्हतेची परीक्षेकरीता (MS-CIT) आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध नसल्याने विहित कालावधीमध्ये श्री.बनसोडे यांना संगणक अर्हत परीक्षा (MS-CIT) उत्तीर्ण करणे शक्य झाले नाही. त्यामुळे मानवी दृष्टीकोनातून व त्यांच्या भविष्याचा विचार करुन, सदर प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दि.९.६.२०११ पासून दि.२८.१.२०१३ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१६०१२८१५१२३४५७२० असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHINDE VIJAY DATTATRAYA

Digitally signed by SHINDE VIJAY DATTATRAYA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD,CID - 917064, postalCode=400032, st=Maharashtra, cn=SHINDE VIJAY DATTATRAYA
Date: 2016.01.28 17:05:51 +05'30'

(वि.द.शिंदे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
२. प्रधान सचिव (ग्रा.वि.व पं.रा.) यांचे स्वीय सहायक
३. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद
५. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
६. संबंधित अधिकारी (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेमार्फत)
७. कार्यासन आस्था-३, ग्रामविकास व जलसंधारण विभाग,
८. निवड नस्ती (कार्यासन क्रमांक:आस्था-३ अ), ग्रामविकास व जलसंधारण विभाग.